


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ४०३    मंगळवार    दि ३० जून २०२६    पृष्ठ ८    किमंत ३ रुपये

# ठाकरेंना सर्वात मोठा हादरा, सचिन अहिर यांनी शिवबंधन सोडलं, थेट विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाचं तिकीट, वरळीत राजकीय भूकंप

**वृत्तसंस्था-मुंबई**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वात मोठा धक्का दिला आहे. ठाकरे गटाचे विधान परिषद आमदार सचिन अहिर यांनी विधान परिषदेच्या उपसभापती पदासाठी शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सचिन अहिर हे ठाकरेंचे अत्यंत विश्वासू नेते मानले जात असत. वरळी विधानसभा मतदारसंघातून आदित्य ठाकरे यांना निवडून आणण्यात सचिन अहिर यांचा मोलाचा वाटा होता. शिवसेनेच्या ऑपरेशन टायगर अंतर्गत सहा खासदार ठाकरेंचं शिवबंधन सोडून शिवसेनेत गेले असतानाच आता सचिन अहिर यांच्या पक्षांतराने ठाकरे गटाला मोठं भगदाड पडलं आहे. उद्धव ठाकरे फुटीर खासदारांच्या मतदारसंघात दौरे करत असतानाच त्यांच्या सुपुत्राच्या मतदारसंघात मोठा राजकीय भूकंप झाला आहे. सचिन अहिर यांनी १९९३ मध्ये राष्ट्रीय मिल मजदूर संघात आपल्या कामाला सुरुवात केली. सचिवपद भूषवल्यानंतर ते या संघटनेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९९६ पासून ते महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाचेही प्रमुख राहिले. त्यांनी माझगाव डॉक, महिंद्रा अँड महिंद्रा युनियन इत्यादींचेही नेतृत्व केले होते. या सर्व उद्योगांमधील कामगारांच्या पगारात वाढ करण्यासाठी करार घडवून आणून त्यांनी कामगार चळवळीवर प्रभाव टाकला. सचिन अहिर आणि त्यांच्या पत्नीने श्री संकल्प प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली होती. वरळी फेस्टिव्हल आणि दहीहंडीच्या काळात ते भव्य स्पर्धा आयोजित करत असत. १९९९ मध्ये सचिन अहिर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर पहिल्यांदा विधानसभेवर निवडून आले. पुढे २००४ आणि २००९ मध्येही त्यांनी आमदारकी राखली. २००९ काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारमध्ये त्यांची गृहनिर्माण राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली. ते राष्ट्रवादीचे मुंबई अध्यक्षपदही भूषवत होते. २०१४ मध्ये त्यांना शिवसेनेचे उमेदवार सुनील शिंदे यांच्याकडून पराभवाचा धक्का बसला. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी शरद पवार यांना मोठा धक्का दिला. त्यांनी एकसंध शिवसेनेत प्रवेश केला. वरळी हा सचिन अहिर यांचा बालेकिल्ला मानला जातो. त्यामुळे २०१९ आणि २०२४ मध्ये आदित्य ठाकरे यांना विधानसभेवर निवडून आणण्यात सचिन अहिर यांचा महत्त्वाचा सहभाग मानला जातो. २०२० मध्ये शिवसेनेच्या उपनेतेपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली.





तर शिवसेनेत फूट पडल्यानंतरही ते ठाकरेंशी एकनिष्ठ राहिले होते. त्यांच्यावर पुणे संपर्क प्रमुख पदाची धुरा सोपवण्यात आली होती. आदित्य ठाकरेंना वरळी मतदारसंघाचे मैदान मोकळं केल्याची बक्षिसी म्हणून २०२२ मध्ये ठाकरेंकडून त्यांची विधान परिषदेवर निवड करण्यात आली सचिन अहिर यांच्या विधान परिषद सदस्यत्वाचा काळ २०२८ पर्यंत आहे. परंतु बदलती राजकीय परिस्थिती पाहता त्यापुढील वाटचालीचा विचार करुन सचिन अहिर यांनी ठाकरेंची साथ सोडण्याचा निर्णय घेतला. आता यावर उद्धव ठाकरे यांची काय प्रतिक्रिया असणार हे पाहणे महत्त्वाचे आहे. सचिन अहिर यांनी शिवबंधन सोडून विधानपरिषदेच्या उपसभापतीपदासाठी अर्ज केला आहे, तुम्हाला या निर्णयाबाबत काय मत आहे? कृपया तुमची मते कमेंट बॉक्समध्ये शेअर करा.

# डॉ. राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालयात नेमकं चाललंय काय?

## परीक्षार्थ्यांना वाटपासाठी आणलं विनापरवाना उत्पादन; सभागृहात सापडले ८ बॉक्स, ३२० पाकिटं १.५३ लाखांचा माल जप्त, गुन्हा दाखल!

**जनसंचलन-बुलढाणा**

बुलढाण्यातील डॉ. राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालयात कृषी मित्र पदाच्या भरती परीक्षेदरम्यान विनापरवाना कृषी उत्पादन वाटपाचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे कृषी विभागाच्या गुणनियंत्रण पथकाने २८ जून २०२६ रोजी महाविद्यालयाच्या तळमजल्यावरील सभागृहात धडक तपासणी केली असता (**Crob Booster (Potassium Humate** ६५%) या जैव उत्तेजक उत्पादनाचे तब्बल ८ मोठे बॉक्स आढळून आले. प्रत्येक बॉक्समध्ये ४० नग याप्रमाणे एकूण ३२० पाकिटे जप्त करण्यात आली असून, प्रत्येक पाकिटाची किंमत ४८० रुपये दाखवलेली आहे. या जप्त मुद्देमालाची एकूण अंदाजित किंमत १ लाख ५३ हजार ६०० रुपये आहे. या उत्पादनाची निर्मिती हिंदुस्तान एजी-टेक बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड, अनवा, ता. भोकरदन, जि. जालना या कंपनीमार्फत झाल्याचे नमूद आहे. कंपनीचे संचालक म्हणून दत्ता पांडुरंग जाधव यांचे नाव समोर आले आहे. घटनास्थळी उपस्थित समन्वयकांकडे साठवणूक, विक्री किंवा वितरणाबाबतचा वैध परवाना मागितला असता कोणतीही अधिकृत कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. उलट, या उत्पादनातील ८० पाकिटे परीक्षार्थ्यांना वितरित केल्याचे सांगण्यात आल्याने प्रकाराचे गांभीर्य अधिक वाढले आहे. कृषी अधिकारी भास्कर कारभारी राहाणे यांच्या फिर्यादीवरून बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात खत नियंत्रण आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास धारकरी यांच्याकडे सोपविण्यात आला असून, कृषी परीक्षेच्या नावाखाली अवैध उत्पादन



वितरणाचा हा प्रकार नेमका कुणाच्या आशीर्वादाने सुरू होता, याचा शोध पोलिसांनी घेणे गरजेचे आहे.

# पेपरफुटीचा वेताळ



नीट परीक्षेचे पेपर फुटल्यानंतर एकीकडे तरुणाईचा संताप देशभरासह दिल्लीतील जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनातून आक्रमकपणे व्यक्त होत आहे. दुसरीकडे २८ जूनला महाराष्ट्रात १,०२८ केंद्रांवर होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेचे (टीईटी) पेपर, परीक्षा सुरू होण्यापूर्वी २४ तास आधी फुटल्याचे उघड झाले. यामुळे सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांचे भविष्य पुन्हा एकदा अंधारात ढकलले गेले आहे. ही पेपरफुटी उघड झाली भिवंडीत. भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा रचून बिहारमधील राजीव शॉ, आकाशकुमार आणि हरियाणाच्या धीरज सिंग या तिघांना अटक केली. मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. या पेपरफ ुटीचे धागेदोरे दिल्लीपर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे, त्यावरून मोठे आंतरराज्य रॅकेट यामागे असणार, हे उघड आहे. आरोपींच्या कबुलीत हा पेपर तब्बल दीड कोटी रुपयांना विकला जाणार होता, असे उघड झाले; म्हणजे आरोपींना रोखले नसते तर टीईटीच्या परीक्षेत कोट्यवधी रुपयांचे गैरव्यवहार झाले असते, यात शंका नाही. आता फेरपरीक्षा तर होईलच, मुख्यमंत्र्यांनी विशेष तपास पथकही स्थापन केले आहे. आरोपींना मकोका लावण्याची चर्चाही सुरू आहे; पण हे सगळे बैल गेल्यावर मजबूत झोपा करण्याच्या बाता मारण्यासारखे आहे. नीट पेपरफुटीचे सावट देशभर असतानाच महाराष्ट्रात हा प्रकार घडावा, हे भयंकर दुर्दैवी आहे. राज्य सरकारने स्थानिक पातळीवर अधिक सावध राहणे गरजेचे होते, पण यंत्रणा गाफील राहिली. देशातील महत्त्वाच्या परीक्षा यंत्रणा जाग्या होऊन काही धडे घेतील आणि कडेकोट सुरक्षेत परीक्षा होतील, अशी अपेक्षा होती; पण परीक्षेच्या आधी आरोपी विमानप्रवास करून दिल्लीहून थेट ठाण्यापर्यंत तंतोतंत जुळणारा पेपर घेऊन पोहोचत असतील तर नेमकी कडक सुरक्षा कुठे आणि कशी लावली होती, असा प्रश्न पडतो. परीक्षा घेणारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आणि प्रश्नपत्रिका छापणाऱ्या केंद्रांवर सरकारचे कसलेही नियंत्रण नाही, हेच यातून स्पष्ट होते. त्यातही टीईटीबाबत हे पहिल्यांदाच घडलेले नाही! २०२०-२१ दरम्यान झालेल्या टीईटी परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे पुणे पोलिसांच्या सायबर सेलने उघडकीस आणले होते. त्यावेळी लाखो रुपये घेऊन विद्यार्थ्यांचे गुण वाढविण्यात आले होते. तरीही पुन्हा हे घडले, यातून राज्य परीक्षा परिषदेचे निर्ढावलेपण दिसते. राज्यभरातून सहा लाखांहून अधिक उमेदवारांनी या परीक्षेसाठी अर्ज केला होता. अनेक विद्यार्थी एसटी बस, रेल्वेने प्रवास करून परीक्षा केंद्र असलेल्या शहरांत पोहोचले होते. ऐनवेळी परीक्षा रद्द झाल्याने विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा वाया गेलाच; पण एकूणच व्यवस्थेबद्दल तीव्र नैराश्य आणि चीड निर्माण झाली. आता फेरपरीक्षेची घोषणा झाली आहे. त्यात महिनाभराचा काळ जाईल, पुन्हा यंत्रणा कामाला लागेल. लोकांच्या करातून आलेला पैसा यंत्रणेच्या ढिसाळ कारभाराची किंमत म्हणून मोजला जाईल. या घोटाळ्यावरून राज्यात विरोधक, विशेषतः काँग्रेस कमालीची आक्रमक झाली असून राज्याच्या शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलनांचे सत्र सुरू झाले आहे. विधिमंडळांतही त्यावर वादळी चर्चा झाली. या प्रकरणाच्या सीबीआय चौकशीची मागणीही झाली. लाखो विद्यार्थ्यांची आयुष्यं पणाला लागलेल्या या परीक्षांमधील घोटाळ्यांची जबाबदारी स्वीकारण्याची मानसिकता ना केंद्र सरकारकडे दिसते आहे, ना राज्य सरकारकडे. नीट प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पद तर सोडाच, अद्याप मौनही सोडलेले नाही; आता राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे वेगळे पाऊल उचलून संवेदनशीलता दाखवतात का बघायचे. नीट पेपरफुटी, सीबीएसईमधील गोंधळ, नागपूर विद्यापीठातील पेपरफ ुटी यानंतर आता टीईटी... एकूणच शिक्षण आणि शासकीय परीक्षा यंत्रणांच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शिक्षक पात्रता परीक्षा ही भावी शिक्षकांची गुणवत्ता तपासण्यासाठी असते. दीड कोटींचा पेपर विकत घेऊन ज्ञानदानाचे पवित्र काम करायला निघालेले हे भावी गुरुजन उद्या आपल्या देशाचे भविष्य घडवणार आहेत! असे शिक्षक शाळांमध्ये रुजू होतील तेव्हा ते पुढच्या पिढीच्या ओंजळीत नेमके काय दर्जाचे ज्ञानकण टाकतील आणि त्यांच्या हातून भावी पिढी कशी घडेल, हा निराश करणारा प्रश्न. या रॅकेटमध्ये परीक्षेचे पेपर दिल्लीहून ठाण्यात घेऊन येणारे या साखळीतले केवळ प्यादे असतील, त्यांचे सूत्रधार, त्यांच्यापर्यंत राज्यातून पोहोचलेले कुणीतरी धंदेवाईक नक्कीच असेल. त्यांच्यापर्यंत तपास यंत्रणा पोहोचतील आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणारे रॅकेट उद्ध्वस्त करण्यात पोलिसांना यश मिळेल, ही आशा. या झाकोळात विद्यार्थ्यांच्या मानगुटीवर पुन:पुन्हा बसणारा पेपरफुटीचा वेताळ दूर व्हावा अन् शिक्षणाचे अवकाश स्वच्छ...मुक्त व्हावे, ही अपेक्षा.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# एमपीएससी परीक्षा आता वर्षातून तीन वेळा होणार; महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निर्णय

**मुंबई/वृत्तसंस्था**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने म्हणजेच एमपीएससीने परीक्षा पद्धतीत आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि ऐतिहासिक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. एमपीएससी आता वर्षातून तीन वेळा परीक्षा घेणार असून मुख्य परीक्षेतून वैकल्पिक विषयही पूर्णपणे वगळण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचा मानसिक ताण कमी करण्यासाठी आणि त्यांना अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयोगाने हा मोठा निर्णय घेतला आहे.



हा नवा बदल सन 2027 पासून लागू होणार असून यामुळे स्पर्धा परीक्षेच्या विश्वात एक नवीन पर्व सुरू होणार आहे. सध्याच्या पद्धतीनुसार एमपीएससीच्या पूर्व परीक्षा वर्षातून केवळ एकदाच घेतल्या जातात. यामुळे वर्षभर अभ्यास करूनही एकाच दिवशी परीक्षा खराब झाली, तर विद्यार्थ्यांचे पूर्ण वर्ष वाया जायचे आणि त्यांच्यावर प्रचंड मानसिक दडपण यायचे. आता हा ताण दूर करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब सेवा पूर्व परीक्षा आणि महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या तिन्ही परीक्षा वर्षातून दोन किंवा अधिक वेळा म्हणजेच तब्बल तीन वेळा घेतल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांचे भवितव्य आता केवळ एका दिवसाच्या परीक्षेवर अवलंबून राहणार नाही, तर त्यांना स्वतःला सिद्ध करण्यासाठी एकाच वर्षात अनेक संधी मिळणार आहेत.

या संपूर्ण बदलांमधील दुसरा सर्वात मोठा निर्णय म्हणजे राज्य सेवा मुख्य परीक्षेतून वैकल्पिक विषय पूर्णपणे वगळण्यात आला आहे. या निर्णयामुळे आता उमेदवारांना वैकल्पिक विषयांचे दोन पेपर द्यावे लागणार नाहीत. बऱ्याच काळापासून विद्यार्थी या विषयांबद्दल मागणी करत होते. या निर्णयामुळे आता सर्व विद्यार्थ्यांना समान पातळीवर स्पर्धा करता येणार असून, वैकल्पिक विषयांची निवड करण्याची आणि त्यामध्ये मिळणाऱ्या मार्कांच्या फरकाची चिंता आता संपणार आहे.

एमपीएससीच्या परीक्षा नियंत्रक व सहसचिव सरिता बांदेकर-देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही संपूर्ण नवीन आणि सुधारित कार्यपद्धती 2027 मध्ये होणाऱ्या पूर्व परीक्षांपासून पूर्णपणे लागू केली जाईल. या दोन्ही किंवा अधिक पूर्व परीक्षांमधून उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी नेमके कसे पात्र ठरवले जाईल, याच्या सविस्तर कार्यपद्धतीबाबत आयोग लवकरच एक स्वतंत्र प्रसिद्धीपत्रक काढून माहिती देणार आहे.

### ओएमआर शीट बंद आता होणार ऑनलाईन परीक्षा


एमपीएससीने केवळ परीक्षांची संख्याच वाढवली नाही, तर संपूर्ण प्रक्रियेचा कायापालट केला आहे. आतापर्यंत होणारी पारंपरिक ओएमआर शीटवरील (पेपर-पेन) परीक्षा पद्धत आता बंद होणार आहे. त्याऐवजी आता संगणकावर आधारित ऑनलाईन परीक्षा म्हणजेच सीबीटी घेतली जाणार आहे. परीक्षा ऑनलाईन होणार असल्यामुळे संपूर्ण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येईल आणि परीक्षांचे निकालही अत्यंत गतीने जाहीर करणे आयोगाला शक्य होणार आहे.

## लोहगड हत्या प्रकरण जलदगती न्यायालयात चालणार; ॲड. उज्ज्वल निकम यांची एंट्री सिया केतनच्या अडचणीत वाढ

**पुणे/वृत्तसंस्था**

पुण्याच्या लोहगड हत्या प्रकरणाने पुरुषांवरील अत्याचाराची एक अतिशय गंभीर बाजू समाजासमोर आणली आहे. स्वतःच्याच होणाऱ्या नवऱ्याला (केतन अग्रवाल) आपल्या प्रियकराच्या मदतीने कट रचून निर्दयीपणे संपवल्याचा धक्कादायक प्रकार यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांनी मुख्य आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन या दोघांनाही बेड्या ठोकल्या असून, या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालणार आहे.

ॲड. उज्ज्वल निकम यांची या प्रकरणात एंट्री झाल्याने सिया केतनच्या अडचणीत वाढ झाली आहे. या प्रकरणाची पुणे पोलिसांकडून अत्यंत कसून चौकशी सुरू असून, दररोज नवनवीन आणि धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी आता आपला मोर्चा सियाच्या कुटुंबाकडे वळवला असून, सियाच्या भावालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. तर दुसरीकडे, आपला मुलगा गमावलेल्या केतन अग्रवालच्या कुटुंबीयांनी न्यायाच्या आशेने थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेत त्यांना साकडे घातले आहे. लोहगड येथे घडलेल्या केतन अग्रवाल यांच्या दुर्दैवी हत्या प्रकरणी, त्यांचे वडील विशाल अग्रवाल यांनी शुक्रवारी पुण्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आपल्या मुलाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अग्रवाल कुटुंबीयांचे सांत्वन करत, त्यांना न्याय देण्यासाठी सरकारकडून कोणतीही कसूर सोडली जाणार नाही आणि या प्रकरणातील दोषींना अत्यंत कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत, असे आश्वासन दिले. लोहगड किल्ल्यावरून ढकलून करण्यात आलेली केतन अग्रवालची हत्या खरोखरच अनाकलनीय आणि धक्कादायक आहे. समाज म्हणून आपण याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. चांगल्या घरच्या आणि सुशिक्षित मुलांमध्ये अशी सूडबुद्धी आणि गुन्हेगारी प्रवृत्ती का निर्माण होते, याचा केवळ कायदेशीरच नाही तर सामाजिक अँगलनेही तपास झाला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



अग्रवाल कुटुंबीयांनी या खटल्यासाठी जलदगती न्यायालयाची स्थापना आणि विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मान्य केली आहे. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी विधी व न्याय विभागाच्या सचिवांना तातडीने आवश्यक ते निर्देश दिले असून, स्वतः ॲड. उज्ज्वल निकम यांनीही या न्यायदानाच्या प्रक्रियेत विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्यास आपली संमती दर्शवली आहे.

## आशा सेविकांना आता राज्य कर्मचारी विमा योजनेचा लाभ; सरकारचा निर्णय

**मुंबई/वृत्तसंस्था**

आशा स्वयंसेविका आणि कमी उत्पन्न असलेल्या कंत्राटी कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सामाजिक सुरक्षा कवच देण्यासाठी राज्य सरकार राज्य कामगार विमा योजना लागू करण्याच्या तयारीत आहे. महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबितकर यांनी राज्यातील, मासिक २१,००० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या आशा कार्यकर्त्या आणि कंत्राटी (एनएचएम) कामगारांसाठी कर्मचारी राज्य विमा योजनेची व्याप्ती वाढवण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मासिक २१,००० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या विविध प्रकारच्या कामगारांना ईएसआयएस योजनेचा लाभ देण्याबाबत चर्चा करण्यासाठी मंत्रालयातील आरोग्य मंत्र्यांच्या समिती कक्षात एक महत्त्वाची बैठक झाली. या योजनेचा लाभ आशा स्वयंसेवक, गट समन्वयक, आरोग्य विभागाचे कंत्राटी कर्मचारी, पतसंस्था कर्मचारी, शिधावाटप दुकान कर्मचारी, खाजगी शाळा कर्मचारी, स्वयंरोजगार संस्था कर्मचारी आणि ग्रंथालय कर्मचारी यांना मिळेल. या बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन, ईएसआयएस आयुक्त रमेश चव्हाण, राष्ट्रीय आरोग्य मिशनचे संचालक आणि आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त डॉ. सुनील भोकर, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कांडेवाड आणि ईएसआयएस संचालक सोहम वायल उपस्थित होते. महाराष्ट्रात अंदाजे ८४,००० आशा कार्यकर्त्या कार्यरत आहेत आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८/१०२) अंतर्गत काम करणारे कर्मचारीदेखील आरोग्य कार्यक्रमांच्या योग्य अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण योगदान देतात. ते कंत्राटी कामगार असल्यामुळे, त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे समान सामाजिक सुरक्षा लाभ मिळत नाहीत. आरोग्य मंत्री प्रकाश अबितकर यांनी अशा सर्व कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सुरक्षेची खात्री करण्यासाठी ईएसआयएसच्या कक्षेत आणण्याकरिता एक सकारात्मक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

## केंद्रीय मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार; श्रीकांत शिंदेंना मिळणार कॅबिनेट

**मुंबई/वृत्तसंस्था**

'ऑपरेशन टायगर' यशस्वी करत उद्धव ठाकरे गटाच्या सहा खासदारांना आपल्या गोटात खेचणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची दिल्ली दरबारात ताकद चांगलीच वाढली आहे. लोकसभेतील वाढलेले संख्याबळ लक्षात घेता येत्या 28 किंवा 29 जून रोजी होणाऱ्या संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेला अतिरिक्त मंत्रिपदे मिळण्याची दाट शक्यता आहे. यात खासदार श्रीकांत शिंदे यांचे नाव कॅबिनेट मंत्रिपदासाठी आघाडीवर असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाही या फेरबदलात कॅबिनेटमध्ये सामावून घेतले जाणार असल्याची चर्चा आहे.



केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराबाबत अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी दिल्लीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे. सध्या केंद्रात शिवसेनेचे एकच मंत्री (प्रतापराव जाधव) आहे. मात्र, 'ऑपरेशन टायगर'नंतर वाढलेल्या बळामुळे शिवसेनेला आता एक कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्री अशी एकूण तीन मंत्रिपदे मिळण्याची चर्चा सुरू आहे. 2024 मध्ये एनडीए सरकार स्थापन होताना शिवसेनेला कॅबिनेट मंत्रिपदाची ऑफर होती, मात्र डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ती नाकारली होती. आता बदललेल्या परिस्थितीत पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या आग्रहाखातर ते हे पद स्वीकारतील, अशी दाट चर्चा आहे. विद्यमान केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांच्याकडील 'आरोग्य राज्यमंत्रिपद' काढून घेऊन ते शिवसेनेच्याच नव्या खासदाराला दिले जाऊ शकते. मात्र, त्यांचा 'आयुष मंत्रालयाचा स्वतंत्र प्रभार' कायम राहील, असेही सूत्रांकडून समजते. दरम्यान, राज्यमंत्रिपदासाठी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव चर्चेत आहे. उबाठा गटातून नुकतेच शिवसेनेत दाखल झालेले ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांचेही नाव मंत्रिपदाच्या शर्यतीत होते. मात्र, मुंबईत पत्रकारांना केलेली जाहीर शिवीगाळ आणि 'बॉम्ब' टाकून मारण्याच्या धमकीमुळे त्यांची प्रतिमा मलिन झाली आहे. हायकमांड त्यांच्या या मुजोर वर्तनामुळे प्रचंड नाराज असून, त्यामुळे त्यांची मंत्रिपदाची संधी हुकल्याचे बोलले जात आहे.

# बनावट 'प्रमा' प्रकरण : तीन दिवस उलटले तरी सूत्रधार मोकाट, तपासाच्या संथगतीवर प्रश्नचिन्ह

**■ गडचिरोली/वृत्तसंस्था**

जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट लेटरहेडवर हुबेहूब स्वाक्षरी करून तब्बल चार कोटी रुपयांच्या विकासकामांसाठी बनावट प्रशासकीय मान्यता आदेश (प्रमा) तयार करण्यात आल्याच्या धक्कादायक प्रकरणात तपासाला तीन दिवस उलटूनही मुख्य सूत्रधार पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. या प्रकरणात काही साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आल्याची, तसेच काही व्यक्तींची नावे तपासात पुढे आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तरीही आरोपींपर्यंत पोलीस पोहोचू न शकल्याने तपासाच्या संथगतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप तर होत नाही ना, अशी चर्चा जिल्हाभर रंगू लागली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या संपूर्ण बनावटगिरीमागे सत्ताधारी पक्षाशी संबंधित




दोन राजकीय कार्यकर्त्यांची 'जोडगोळी' असल्याची चर्चा आहे. मागील काही महिन्यांत या दोघांनी एका माजी राज्यमंत्र्यांच्या निकटवर्तीयांमध्ये स्थान मिळविल्याचे बोलले जात असून, त्यापैकी एका व्यक्तिने संबंधित माजी राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक (पीए) म्हणूनही काम केल्याची माहिती समोर येत आहे. या राजकीय जवळिकीचा फायदा घेत जिल्हा खनिज प्रतिष्ठान (डीएमएफ) निधीतील विकासकामांसाठी बनावट प्रशासकीय मान्यता आदेश तयार करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ही बनावट कागदपत्रे एका निकटवर्तीय कंत्राटदाराकडे पोहोचविण्यात आली होती. या व्यवहारातून मिळणाऱ्या कथित टक्केवारीच्या वाटणीवरून संबंधितांमध्ये मतभेद निर्माण झाल्यानंतरच हा संपूर्ण प्रकार बाहेर आल्याची चर्चा आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या पदावरील अधिकाऱ्यांच्या तक्रारीनंतरही तपास अपेक्षित वेगाने पुढे सरकत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पोलीस तांत्रिक तपास सुरू असल्याचे सांगत असले, तरी अद्याप आरोपींचा ठावठिकाणा लागलेला नाही. काही संशयितांची नावे समोर आल्याची चर्चा असतानाही त्यांच्याविरुद्ध ठोस कारवाई न झाल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रकरणात काही राजकीय व्यक्तींची नावे जोडली जात असल्याने त्यांना वाचविण्यासाठी दबाव तर येत नाही ना, अशीही शंका व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वीही देसाईगंज येथील एका कथित राजकीय नेत्याने जिल्हाधिकाऱ्यांसोबतचे संभाषण व्हायरल केले होते. त्या प्रकरणातही मोठी चर्चा होऊनही कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून आले नव्हते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारीसारख्या सर्वोच्च प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नावाचा आणि स्वाक्षरीचा गैरवापर होऊनही आरोपी अद्याप मोकाट असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात निष्पक्ष आणि वेगवान तपास करून दोषींवर कठोर कारवाई होणार का, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## सासूचा निर्घृण खून करून १३ वर्षे फरार असलेला जावई चेन्नईतून गजाआड; वसई गुन्हे शाखेची कारवाई

**■ वसई/वृत्तसंस्था**

कौटुंबिक वादातून सासूचा निर्घृण खून करून गेल्या १३ वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या फरार आरोपीला अटक करण्यात वसई गुन्हे शाखा कक्ष-२ च्या पथकाला अखेर यश आले आहे. मोहम्मद अजमल मोहम्मद मन्सुरी अन्सारी उर्फ 'पोफल' (४४) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याला तामिळनाडूच्या मिंजूर (चेन्नई) येथून ताब्यात घेण्यात आले.



१४ सप्टेंबर २०१३ रोजी ही धक्कादायक घटना घडली होती. पत्नी आणि सासू मिळून आपल्या नवजात मुलाला आपल्याला भेटू देत नाहीत, याच रागातून आरोपी मोहम्मद अजमल याने आपली सासू संजीता कयुम यांची निर्घृण हत्या केली होती. या थरारक हत्याकांडानंतर आरोपी पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाला होता. या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हे शाखा कक्ष-२ चे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने या जुन्या आणि थंड बस्त्यात पडलेल्या गुन्ह्याचा नव्याने समांतर तपास सुरू केला. पोलिसांच्या पथकाने सर्वप्रथम आरोपीच्या मुंगेर (बिहार) येथील मूळ गावी जाऊन माहिती काढली. तेव्हा धक्कादायक बाब समोर आली की, तो गेल्या १३ वर्षांत एकदाही आपल्या गावी परतला नव्हता. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली. तपासात समोर आले की, गुन्ह्यानंतर आरोपी आधी कलकत्ता येथे आपल्या बहिणीकडे ४-५ दिवस राहिला.

तिथून तो तामिळनाडूमध्ये पळून गेला आणि तिथे ५-६ वर्षे गवंडीकाम करत राहिला. त्यानंतर १ वर्ष पंजाबमध्ये काढल्यानंतर, गेल्या ५ वर्षांपासून तो चेन्नईजवळ आपले 'पोफल' हे नाव बदलून, नवीन ओळख निर्माण करून पोलिसांपासून लपून राहत होता. मिळालेल्या ठोस माहितीच्या आधारे वसई गुन्हे शाखेचे विशेष पथक तात्काळ तामिळनाडूला रवाना झाले. त्यांनी २४ जून २०२६ रोजी मिंजूर (तामिळनाडू) येथून आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

ही कारवाई वसई गुन्हे शाखा कक्ष-२ चे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, संजय नवले, रवींद्र पवार, मनोज मोरे, चंदन मोरे, प्रफुल्ल पाटील, प्रशांतकुमार ठाकूर, सचिन पाटील, जगदीश गोवारी, राहुल कर्पे, अक्षय बांगर तसेच सायबर पोलीस ठाण्याचे संतोष चव्हाण यांच्या पथकाने केली आहे.

## पोलिसांनी दिले १९ जनावरांना जीवदान



**■ नांदेड/वृत्तसंस्था**

कत्तल करण्यासाठी वाहनांमधून नेण्यात येणाऱ्या १० तसेच देगलूर नाका भागात बांधून ठेवलेल्या ९ अशा १९ गोवंशांना नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवार (दि.२६) रोजी जीवदान दिले. या प्रकरणी चार आरोपींविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यात अवैध मार्गाने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती नव्याने रुजू झालेले पोलीस अधीक्षक डॉ.नीलभ रोहन यांना मिळाली. त्यांनी या घटनेची तात्काळ दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना या बाबीची माहिती दिली. त्यांनी लगेच आपल्या सहकाऱ्यांना देगलूर नाका भागात पाठवले. या दरम्यान आलु-कांदा मार्केट भागातील मलशुद्धीकरण केंद्रासमोरील एकबाल नगर पाण्याच्या टाकीजवळ आरोपी मो.सादीक अब्दुल गफुर याच्या शेडमध्ये गोवंश जातीची जनावरे कत्तलीसाठी येणार असल्याचे समजल्यानंतर पोलिसांनी शुक्रवारी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास वाहन क्र.एम.एच.२६.बीइ.४९४६ची तपासणी केली असता १० बैल आढळून आले. तसेच याच ठिकाणी ०८ बैल व एक गाय शेडमध्ये बांधल्याचे दिसून आले.

पोलिसांनी १९ जनावरांना जीवदान दिले. या प्रकरणी आरोपी झबीउल्ला खान (वय ३०), शे.कलीम (वय ३५), मो.सादीक (वय ४८), मो.रिझवान (वय ४०) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## विरारमध्ये पार्किंगच्या वादातून १५ वर्षीय अल्पवयीन मुलावर हल्ला

**■ वसई/वृत्तसंस्था**

विरार पूर्वेच्या कारगिल नगर भागातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. इमारतीखाली वाहन पार्किंग करण्यावरून झालेल्या वादातून एका १५ वर्षीय मुलाला मारहाण करीत त्याच्यावर चाकू हल्ला केला आहे. यात हा मुलगा गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विरार पूर्वेच्या भागातील कारगिलनगर डोंगरी गणेश चौक भागात महाकाली अपार्टमेंट नावाची इमारत आहे. २२ जून रोजी या इमारतीत एका तरुणाचा वाहन पार्किंग करण्यावरून वाद झाला होता. या किरकोळ वादातून काही तरुणांच्या टोळीने संबंधित तरुणाला बेदम मारहाण करत त्याच्यावर चाकूने वार केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, मारहाणीची संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्याचे फुटेज समोर आले आहे. इमारती खाली वाहन पार्किंगची जागा आहे त्यात नेहमी माझा मुलगा गाडी लावतो. मात्र इमारतीत मधील काहींनी इथे वाहन पार्किंग करू नको त्यावरून वाद झाला त्यातून ही मारहाण केल्याचे मुलाच्या वडिलांनी सांगितले आहे. काही वाद झाला तरी मुलांना अशा पध्दतीने मारणे चुकीचे आहे. जे यात दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली आहे.

इमारतीत दोन गटात वाद झाले होते. या प्रकरणी दोन्ही गटावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती विरार पोलिसांनी दिली आहे.



# प्रो लीगमध्ये भारताचा पाकिस्तानवर 7-1 ने दणदणीत विजय; दशकभराचे वर्चस्व अबाधित

**लंडन/वृत्तसंस्था**

भारताच्या हॉकी संघाने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवत आपला अपराजित राहण्याचा विक्रम कायम राखला आहे. लंडन येथील ली व्हॅली हॉकी अँड टेनिस सेंटरमध्ये २६ जून रोजी खेळल्या गेलेल्या २०२५-२६ एफआयएच (FIH) प्रो लीगच्या आपल्या उपांत्य सामन्यात संघाने ७-१ असा विजय मिळवला आणि गेल्या एका दशकापासून सुरू असलेली विजयाची मालिका अबाधित ठेवली. मंगळवारी, २३ जून रोजी याच मैदानावर ४-३ असा विजय मिळवल्यानंतर, भारतीय संघाने आपल्या कट्टर प्रतिस्पर्ध्याविरुद्ध अवघ्या चार दिवसांत हा दुसरा विजय नोंदवला.




पाकिस्तानने या सामन्यात १३ व्या मिनिटालाच पहिला गोल करून भारतावर १-० अशी आघाडी घेतली. पाकिस्तानसाठी अबू महमूदने पहिला गोल केला, मात्र त्यानंतर भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि उर्वरित सामन्यात पाकिस्तानला एकही गोल करू दिला नाही. दुसऱ्या सत्रात सुखजीत सिंगने २० व्या मिनिटाला गोल करत भारताला सामन्यात बरोबरीत आणलं. त्यानंतर भारतीय संघाने अधिक आक्रमक खेळ केला; २६ व्या मिनिटाला कर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरद्वारे शानदार गोल करत संघाला सामन्यात २-१ अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्राच्या अखेरीस भारताकडे २-१ अशी आघाडी होती.

दुसऱ्या सत्रात एक दुर्दैवी घटना घडली, ज्यामध्ये पाकिस्तानी खेळाडू अहमद नदीमच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली; वैद्यकीय उपचारानंतर त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आलं. त्यानंतर, तिसऱ्या सत्रात हार्दिक सिंग (३४ व्या मिनिटाला), जुगराज सिंग (३५ व्या मिनिटाला), अभिषेक (४१ व्या मिनिटाला) आणि राजकुमार पाल (४४ व्या मिनिटाला) यांनी गोल केले; तर अंतिम सत्रात दिलप्रीत सिंगने केलेला गोल (५४ व्या मिनिटाला) म्हणजे 'सोने पे सुहागा' ठरला आणि भारताचा ७-१ असा मोठा विजय निश्चित झाला. भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळल्या गेलेल्या गेल्या १९ सामन्यांपैकी भारतीय संघाने १७ सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानला एकही विजय मिळवता आलेला नाही.

भारताच्या या विजयाच्या मालिकेची सुरुवात १२ एप्रिल २०१६ रोजी (३,२७८ दिवसांपूर्वी) क्वालालंपूरमधील 'सुलतान अझलन शाह' स्पर्धेतील एका सामन्याने झाली होती. ऑलिम्पिकमध्ये आठ वेळा सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाला आपल्या कट्टर प्रतिस्पर्ध्यांकडून शेवटचा पराभव २०१६ मध्ये गुवाहाटी येथे झालेल्या 'दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धा'मध्ये (South Asian Games) पत्करावा लागला होता.

## "टेस्ट मॅचसारखं वाटू लागलं होतं", भारताला हरवल्यानंतर आयर्लंडचा कर्णधार काय म्हणाला ?

**बेलफास्ट/वृत्तसंस्था**

बेलफास्टच्या मैदानावर पार पडलेल्या सामन्यात भारतीय संघाला आयर्लंडकडून लाजिरवाण्या पराभवाचा सामना करावा लागला आहे. या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या आयर्लंडकडून कर्णधार लॉर्कन टकरने दमदार अर्धशतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर आयर्लंडने २० षटकात ९ गडी बाद १८२ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना भारताचा डाव अवघ्या १४८ धावांवर आटोपला. यासह भारताने हा सामना ३४ धावांनी गमावला. दरम्यान या ऐतिहासिक विजयानंतर लॉर्कन टकर काय म्हणाला? जाणून घ्या.



भारतीय संघ हा सलग २ वेळचा टी-२० वर्ल्ड चॅम्पियन संघ आहे. या संघात एकापेक्षा स्फोटक फलंदाज आहे. पण आयर्लंडच्या नवख्या गोलंदाजासमोर भारतीय फलंदाजी ढेपाळली. सामन्यानंतर बोलताना टकर म्हणाला, "हा विजय अत्यंत खास आहे. घरच्या मैदानावर, हंगामाच्या पहिल्याच सामन्यात, टी-२० वर्ल्डकपविजेत्या संघाला पराभूत करणं ही खूप मोठी गोष्ट आहे. याचे सर्व श्रेय खेळाडूंना जाते. आमच्याकडे २ पदार्पणवीर होते, ज्यांनी खरोखरच चांगली कामगिरी केली."

या सामन्यात आयर्लंडलाही हवी तशी सुरुवात करता आली नव्हती, पण त्यानंतर गॅरेथ आणि टकरने महत्वपूर्ण भागीदारी केली. याबाबत बोलताना तो म्हणाला, "भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीला खूप चांगली गोलंदाजी केली. त्यांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी केली. ते एकाच टप्प्यावर गोलंदाजी करत राहिले. त्यामुळे फटके मारणं आव्हानात्मक बनलं होतं. एका क्षणी तर हा सामना कसोटी सामन्यासारखा वाटू लागला होता. पण आम्ही सामन्यात टिकून राहण्याचा प्रयत्न केला. एक भागीदारी आणि आम्हाला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी मिळाली."

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना टकरने सर्वाधिक ५० धावांची खेळी केली. तर गेराथने ४९ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर आयर्लंडने २० षटकांअखेर ९ गडी बाद १८२ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाकडून अभिषेक शर्माने एकाकी झुंज देत ५० धावांची खेळी केली. पण त्याला इतर कुठल्याही फलंदाजाकडून हवी तशी साथ मिळाली नाही. भारतीय संघाचा डाव अवघ्या १४८ धावांवर आटोपला. यासह भारतीय संघाने हा सामना ३४ धावांनी गमावला.

## जपान आणि स्वीडन यांच्यातील रोमहर्षक लढत १–१ बरोबरीत सुटली

**कॅन्सास सिटी/वृत्तसंस्था**

मुसळधार पावसातही नेदरलँड्स संघाने निर्विवाद वर्चस्व राखत अखेरच्या गट साखळी सामन्यात ट्युनिशियाचा ३-१ असा पराभव केला. तीनही सामन्यात नेदरलँड्सच्या परिपूर्ण नियोजनाने प्रतिस्पध्यांवर मात केली. आक्रमक आणि बचावफळीत सुरेख समन्वय त्यांच्या खेळाचे वैशिष्ट्य ठरले असून, आता त्यांचा कस लागेल. बाद फेरीत त्यांची गाठ मोरोक्कोशी पडणार आहे.

ट्युनिशियाचा गेल्या काही आठवड्यांची खराब लय कायम राहिली. नेदरलँड्सच्या डेन्झेल डमफ्रिजने तिसऱ्याच मिनिटाला गोलपोस्टच्या दिशेने मारलेला चेंडू बाहेर काढण्याच्या नादात ट्युनिशियाचा कर्णधार एलिस स्खिरीने पाय लावला आणि चेंडू थेट त्यांच्याच जाळ्यात गेला. यानंतर सातव्या मिनिटाला २५ यार्डांवरून मिळालेल्या फ्री-किकवर ६ फूट ५ इंच उंचीच्या व्हर्जिल व्हॅन डायकने उत्कृष्ट हेडर मारत चेंडू पास केला. यावर ब्रायन ब्रॉबीने कोणतीही चूक न करता ट्युनिशियाचा गोलरक्षक आयमेन डामेनला चकवून गोल केला आणि नेदरलँड्सला २-० अशी आघाडी मिळवून दिली. ट्युनिशियाने ५४ व्या मिनिटाला हॅझेम मास्तौरीच्या कॉर्नर किकवरील गोलमुळे सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, ६२ व्या मिनिटाला नेदरलँड्सच्या यान पॉल व्हॅन हेकेचा हेडर ट्युनिशियाच्या अनिस स्लिमानेच्या डोक्याला लागून गोलपोस्टमध्ये गेला. अखेरच्या साखळी सामन्यात सर्वस्व पणाला लावून खेळणाऱ्या जपान आणि स्वीडन संघांदरम्यान अखेरच्या क्षणापर्यंत रोमांचक ठरलेला सामना अखेर १-१ असा बरोबरीत सुटला. या बरोबरीसह दोन्ही संघांनी बाद फेरीत प्रवेश केला. सामन्याच्या ६२ व्या मिनिटाला अँथनी एलांगाने पेनल्टी कक्षाच्या उजव्या कोपऱ्याबाहेरून डाव्या पायाने मारलेली अप्रतिम किक थेट गोलजाळ्यात गेली. त्याचा या स्पर्धेतील हा दुसरा गोल होता. या गोलच्या सहा मिनिटांपूर्वी रित्सुच्या सुरेख पासवर डायझेन माएडाने पेनल्टी एरियात चेंडू डाव्या पायाने नियंत्रणात घेतला आणि स्वीडनचा गोलरक्षकतुर्कीयेला चकवून गोल करुन जपानला आघाडीवर नेले होते.

## FIFA WC मध्ये केप व्हर्डेचा आता मेस्सीच्या अर्जेंटिनाशी सामना

**फिलाडेल्फिया/वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६ मधील सर्वच सामने अटीतटीचे होताना दिसत आहेत. अगदी पहिल्यांदाच फिफा विश्वचषक खेळत असलेल्या संघांनी कमालीची कामगिरी करत सर्वांना थक्क केलं. याचबरोबर पहिल्यांदाच फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरलेला केप व्हर्डे देश राऊंड ऑफ-३२ साठी क्वालिफाय झाला आहे. स्पेनला एकही गोल करू न दिलेल्या व्होझिन्या आणि पहिल्याच सामन्यातील संघाच्या कामगिरीमुळे केप व्हर्डे देश चर्चेत आला आणि आता संघाने पुढील फेरीत स्थान मिळवलं असून तिथे त्यांचा सामना वर्ल्ड चॅम्पियन अर्जेंटिनाशी होणार आहे.

ग्वाडालाजारा आणि ह्यूस्टन येथे शुक्रवारी रात्री जवळपास एकाच वेळी सामने संपल्याच्या शिट्ट्या वाजल्या. ग्वाडालाजारामध्ये उरुग्वेचा स्पेनकडून ०-१ असा पराभव झाला, तर ह्यूस्टनमध्ये केप व्हर्डेने



सौदी अरेबियाला गोलशून्य बरोबरीत रोखत बाद फेरी गाठल्याचा संघाने जल्लोष केला.

ह्यूस्टनमध्ये केप व्हर्डेने सौदी अरेबियाला गोलशून्य बरोबरीत रोखत इतिहास घडवला. ४८ संघांच्या विस्तारित फिफा विश्वचषकातील सर्वात मोठ्या अपसेटपैकी एक मानल्या जाणाऱ्या या निकालामुळे केप व्हर्डेने आपल्या बचावात्मक खेळाच्या जोरावर ग्रुप एचमधील कोणत्याही संघाला विजय मिळवू दिला नाही. या बरोबरीमुळे उरुग्वेचे गट टप्प्यातील आव्हानही संपुष्टात आलं आणि केप व्हर्डेने ऐतिहासिक कामगिरी करत विश्वचषकात आपली वेगळी छाप पाडली.

पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यालगत असलेल्या ज्वालामुखीजन्य १० बेटांचा छोटासा देश केप व्हर्डेने आपल्या पहिल्याच फिफा विश्वचषकात इतिहास लिहिला आहे. ग्रुप एचमध्ये दुसरं स्थान पटकावत त्यांनी बाद फेरीत धडक मारली. अवघ्या ५६ वर्षीय प्रशिक्षक बुबिस्ता यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणारा केप व्हर्डेचा संघ विश्वचषकाच्या बाद फेरीत पोहोचणारा क्षेत्रफळ आणि लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वात छोटा देश ठरला. विशेष म्हणजे, अवघ्या आठ महिन्यांपूर्वीच या संघाने प्रथमच विश्वचषकासाठी पात्रता मिळवली होती.

केप व्हर्डेने स्पर्धेची सुरुवात माजी विश्वविजेत्या स्पेनला ०-० अशी बरोबरीत रोखून केली होती. त्या सामन्यातील भक्कम बचावामुळे त्यांच्या शिस्तबद्ध खेळाची झलक पाहायला मिळाली. मात्र, ते केवळ बचावावर अवलंबून नसून आक्रमणातही प्रभावी ठरू शकतात, हे त्यांनी दुसऱ्या सामन्यात उरुग्वेविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधत सिद्ध केलं. या निकालामुळे त्यांच्या बाद फेरीच्या आशा अधिक बळकट झाल्या.

साखळी फेरीतील अखेरच्या सामन्यात केप व्हर्डेला बाद फेरी गाठण्यासाठी केवळ पराभवापासून वाचायचं होतं. दुसरीकडे, स्पेनने ॲलेक्स बाएनाच्या ४२व्या मिनिटातील गोलच्या बळावर उरुग्वेचा १-० असा पराभव केला. त्यामुळे सौदी अरेबियाविरुद्ध गोलशून्य बरोबरी साधण्यात केप व्हर्डेचा अभेद्य बचाव निर्णायक ठरला आणि त्यांनी ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली. मात्र, आता केप व्हर्डेसमोरचं आव्हान अधिक कठीण असणार आहे. विश्वचषकातील पदार्पणातच इतिहास रचणाऱ्या केप व्हर्डेचा राऊंड ऑफ ३२ मध्ये विद्यमान विश्वविजेत्या अर्जेंटिनाशी सामना होणार असून, हा सामना ४ जुलै रोजी मियामी येथे खेळवला जाणार आहे.

# 'दर्याभवानी' चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित






दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या बहुचर्चित 'शिवराज अष्टक' चित्रपटांमधील सातवे चित्रपुष्प समोर आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यावर आधारित या चित्रपटांच्या मालिकेतील सातव्या चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले आहे. 'शिवराज अष्टक'मधील सातवे चित्रपुष्प हे 'दर्याभवानी' असणार आहे. याचे लक्षवेधी पोस्टर रिलीज झाले असून यामध्ये चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखदेखील समोर आली आहे. दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'दर्याभवानी' चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यनिर्मिती करताना दाखवलेले शौर्य आणि त्यांना भक्कम साथ देणाऱ्या शिलेदारांची कथा शिवराज अष्टकमधून मांडली जाते. शिवराज अष्टकमधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित सलग आठ चित्रपट तयार करण्यात येणार आहेत. यामधील सहा चित्रपट यापूर्वी प्रदर्शित झाले असून त्यांना प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला आहे. यानंतर आता सातवा चित्रपट 'दर्याभवानी'चे पोस्टर रिलीज करण्यात आले आहे. हा चित्रपट मराठा आरमाराचे पहिले प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या पराक्रमावर आधारित असणार आहे. समुद्र आणि स्वराज्यामध्ये ढाल बनून राहिलेल्या कान्होजी आंग्रे यांच्या शौर्याचा प्रवास यामधून मांडण्यात येणार आहे.

'दर्याभवानी' सिनेमाचे लेखन व दिग्दर्शन दिग्पाल लांजेकर यांनी केले आहे. तसेच श्री तिरुपती बालाजी चित्र, प्रकाश पाटील, डॉ अशोक जीवतोडे आणि एलिव्हेट फिल्म्स यांनी निर्मिती केली आहे. पुष्कर यावलकर सहनिर्माता असून नितीन वाघ हे सह लेखक आहेत. यामध्ये अभिजीत श्वेतचंद्र, मृणाल कुलकर्णी, समीर धर्माधिकारी, स्मिता शेवाळे, अजय पूरकर, मृण्मयी देशपांडे, ऋषी सक्सेना, आस्ताद काळे, प्रसन्न केतकर, निखिल राऊत, नितीन वाघ आणि सचिन देशपांडे या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. पोस्टरमध्ये हा सिनेमा पुढील वर्षी रिलीज होणार असल्याचे नमूद केले आहे. १५ जानेवारी २०२७ रोजी 'दर्याभवानी' चित्रपटगृहात रिलीज होणार आहे.

शिवराज अष्टक ही लेखक आणि दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांची महत्त्वाकांक्षी आणि लोकप्रिय चित्रपट मालिका आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि त्यांचे कार्य पडद्यावर मांडण्यात येत आहे. २०१८ पासून ही मालिका सुरू असून यातील सहा चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. 'फर्जंद' (२०१८), 'फत्तेशिकस्त' (२०१९), 'पावनखिंड' (२०२२), 'शेर शिवराज' (२०२२), 'सुभेदार' (२०२३), 'शिवरायांचा छावा' (२०२४) असे चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. यानंतर आता सातवे पुष्प हे सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या समुद्रातील आरमार उभारणीवर आधारित असणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले असून यामध्ये मावळ्यांची समुद्रावरील ताकद दाखवण्यात आली आहे. तसेच भगवा झेंडा हाती घेतलेले छत्रपती शिवाजी महाराज लक्ष वेधून घेत आहेत.

## "आई–वडिलांचा दोष नाही", सिया गोयलबद्दल कंगना रणौत यांची पोस्ट



लोहगड येथे अपघात झाल्याचा बनाव रचून सिया गोयल या २० वर्षीय तरुणीने रिअल इस्टेट व्यावसायिक असलेल्या २६ वर्षीय केतन अग्रवालची हत्या केली. या हत्येत तिला तिचा प्रियकर चेतन चौधरी याने मदत केल्याचे समोर आले आहे.या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस घेत आहेत. यावर अभिनेत्री व खासदार कंगना रणौत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत कंगना यांनी मुलांचे पालनपोषण आणि त्यांची संगत यावर भाष्य केले आहे.

पुण्यातील हत्येच्या घटनेवर अभिनेत्री आणि भाजपा खासदार कंगना रणौत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. २६ जून रोजी शुक्रवारी इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत कंगना रणौत यांनी या घटनेवर भूमिका मांडली. मुलांच्या अशा कृत्यांसाठी फक्त त्यांच्या पालकांनाच जबाबदार धरले जाऊ नये असे मत कंगना यांनी मांडले आहे. सध्याच्या पिढीवर सोशल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा मोठा प्रभाव असून त्याच्यासह असणाऱ्या मित्र-मैत्रिणींचा सहवासाचादेखील परिणाम होत असल्याचे मत कंगना यांनी व्यक्त केले आहे.

कंगना रणौत यांनी पोस्टमध्ये लिहिलं, "आजकाल एखाद्या कुटुंबाकडे, घराकडे किंवा आई-वडिलांकडे पाहून त्यांच्या मुलांवर कोणते संस्कार झाले आहेत, याचा अंदाज लावणे कठीण झाले आहे. सध्याच्या काळात मुलांवर नेमका कोणाचा प्रभाव आहे? मुलं कोणाबरोबर वेळ घालवतात, सोशल मीडियावर त्यांना कोण प्रभावित करतं, एआय व खऱ्या आयुष्यात त्यांच्यावर कोणाचा प्रभाव पडतो, याकडे लक्ष देण्याची गरज आहे."

पुढे त्यांनी लिहिलं, "मुलांच्या प्रत्येक गोष्टीसाठी पालकांना दोष देता येणार नाही. कारण आजच्या काळात लोक वेगवेगळी आयुष्ये जगत असतात. स्वतःची आदर्श प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात आणि खरा स्वभाव कसा आहे किंवा त्यांची स्वतःची काय मत आहेत यापेक्षा इतरांच्या नजरेत ते कसे दिसतात, याला जास्त महत्त्व देतात. त्यामुळे मुलांच्या कृत्यांसाठी त्यांच्या कुटुंबाला किंवा पालकांना जबाबदार धरणे योग्य ठरणार नाही."

## सुनील शेट्टीची नात करते नरेंद्र मोदींची पूजा; म्हणाला, "साईबाबांच्या पोथीत त्यांचा फोटो"

माझ्या १५ महिन्यांच्या नातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी आवडतात. ती त्यांची पूजा करते, लाडूंचा नैवेद्य दाखवते हे वक्तव्य केलं आहे अभिनेता सुनील शेट्टीने. सुनील शेट्टीने एका मुलाखतीत मोदी त्याला किती आवडतात हे सांगताना त्याच्या नातीचा उल्लेख केला आहे. नरेंद्र मोदींची भेट पहिल्यांदा कधी झाली हे देखील सुनील शेट्टीने सांगितलं आहे.



मी कायमच सांगत आलो आहे मी पंतप्रधान मोदींचा चाहता आहे. मी कुठल्याही पक्षाबाबत भाष्य करत नाही. मला जर का एखादा नेता पसंत पडतो तर तो पडतो. मी जसं देशावर प्रेम करतो अगदी तसंच माझं पंतप्रधान नरेंद्र मोदींवर प्रेम आहे. तुम्ही विश्वास ठेवणार नाही, माझी नात १५ महिन्यांची आहे. तिला फक्त कुणीतरी सांगितलं की हे मोदीजी आहेत. ती रोज सकाळी येते साईबाबाची पोथी आहे, त्यात मोदींचा फोटो आहे. ती येते ती पोथी उघडते, मोदीजी मोदीजी म्हणते. गणपतीच्या मूर्तीच्या जवळ जाते एक लाडू घेऊन येते आणि मोदींच्या फोटोला खाऊ घालते. मी तिला काहीही सांगितलेलं नाही. तिच्या आईने तिला काहीही सांगितलेलं नाही. तिच्या नॅनीने काही सांगितलेलं नाही. नॅनीने फक्त एअर पोर्टवर तिला मोदींचा फोटो दाखवला होता आणि म्हटलं होतं की हे मोदीजी आहेत. त्या माणसामध्ये काहीतरी असेल ना? ती एकटी मुलगी अशी नाही जिला मोदीजी आवडतात. १५ महिन्यांच्या मुलापासून अगदी ६५ वर्षांच्या वयापर्यंतच्या लोकांना म्हणजेच अबालवृद्धांना मोदी आवडतात. आम्ही तिला मोदीजी असं म्हण हे पण सांगितलेलं नाही. तरीही त्यांना मोदीजी असंच म्हणते. त्या माणसामध्ये काहीतरी जादू आहे असं विधान अभिनेता सुनील शेट्टीने केलं आहे. बाते दिलसे या विथ नविका कुमार या पॉडकास्टमध्ये सुनील शेट्टीने हे भाष्य केलं आहे.

मी नरेंद्र नरेंद्र मोदींना अहमदाबादमध्ये काही कामानिमित्त भेटलो होतो. ११ वाजता भेटीची ठरली होती. ११ वाजता दार उघडलं गेलं आणि नरेंद्र मोदी मला म्हणाले हां बोला सुनील शेट्टी काय म्हणता? मी इतका खुश झालो की मला क्षणभर लक्षात आलं नाही की काय प्रकारे प्रतिसाद देऊ? मला वाटतं २०१० वगैरेची ही गोष्ट असेल. थेट डोळ्यांत डोळे घालून ते बोलत होते. तेव्हापासूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाची माझ्यावर छाप पडली. आज तुम्ही अमेरिकेला जा, लंडनला जा, युरोपमध्ये जा भारतीय म्हणून तुम्हाला जेव्हा पाहिलं जात त्या दृष्टिकोनात फरक पडला आहे. अभिनेता सुनील शेट्टीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड टीका होते आहे. पॉडकास्टमधला हा व्हिडीओ पोस्ट करत नेटकऱ्यांनी सुनील शेट्टीला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे. एका युजरने म्हटलंय तुला राष्ट्रीय पुरस्कार हवा आहे का? की राज्यसभेची खासदारकी हवी आहे? दुसरा युजर म्हणतो सुनील शेट्टी तू भक्त असण्याच्याही सगळ्या मर्यादा पार केल्या आहेत. किती ती भक्ती? सुनील तुझा कुठला सिनेमा येतोय का? असंही एका युजरने विचारलं आहे. १५ महिन्यांची नात मोदींच्या फोटोची पूजा करते या वाक्यावरुन नेटकरी संतापले आहेत आणि त्याला प्रचंड ट्रोल करत आहेत.

## IVF चे दोन प्रयत्न अयशस्वी, ४३ व्या वर्षी तीन मुलांना दिला जन्म; फराह खानने सांगितला गरोदरपणातील संघर्ष



ओम शांती ओम' या २००७ मधील सुपरहिट चित्रपटाचं दिग्दर्शन करत असताना दिग्दर्शिका आणि कोरिओग्राफर फराह खान तिच्या वैयक्तिक आयुष्यात मोठ्या संघर्षातून जात होती. त्या काळात तिचे आयव्हीएफचे प्रयत्न (IVF) दोन वेळा अयशस्वी झाले होते.

फराह खान व तिचा नवरा शिरीष कुंदर यांनी २००८ मध्ये अखेर आनंदाची बातमी दिली. आयव्हीएफच्या मदतीने त्यांना अन्या, दिवा आणि झार ही तीन मुलं झालं. 'शेखर टुनाइट' या कार्यक्रमात शेखर सुमनशी संवाद साधताना फराहने वयाच्या चाळिशीनंतर आई बनण्याचा अनुभव आणि गर्भधारणेनंतर वाढलेल्या वजनामुळे आलेल्या अडचणींबद्दल मनमोकळेपणाने भाष्य केलं.

कार्यक्रमादरम्यान फराह खानने सांगितलं की, आयव्हीएफद्वारे आई होण्याची आशा तिला होती, पण एकाच वेळी तीन मुलं होतील, याची तिने कधीच कल्पना केली नव्हती. फराह म्हणाली, "मला तीन मुलं होतील, असं कधी वाटलं नव्हतं. पण किमान एक मूल तरी होईल, याची मला खात्री होती. आयव्हीएफ उपचार सुरू केले तेव्हा माझं वय ४२ होतं आणि मुलांना जन्म दिला तेव्हा मी ४३ वर्षांची होते. त्यामुळे आई होण्यासाठीचं सर्वसाधारण मानलं जाणारं वय मी ओलांडलं होतं."

फराह खानने पुढे सांगितलं की, गर्भधारणेनंतर वाढलेलं वजन कमी करण्यासाठी तिला खूप संघर्ष करावा लागला. ती म्हणाली, "अभिनेत्री आणि सेलिब्रिटी दोन महिन्यांतच गर्भधारणेनंतरचं वाढलेलं वजन कमी करून पुन्हा पूर्वीसारख्या दिसतात, ते पाहिलं की मला आश्चर्य वाटतं. माझं मात्र प्रेग्नन्सीनंतरचं वजन कमी व्हायला तब्बल चार ते पाच वर्षं लागली."

पती शिरीष कुंदर बद्दल फराह म्हणाली, "आता शिरीष आणि माझा मुलगा झार दोघांचीही उंची जवळपास सारखीच आहे. त्यामुळे रात्री मी झोपलेली असताना बेडरूममध्ये कोण आलं, तर तो झार आहे की शिरीष, हे मला कळत नाही. पण जेव्हा तो जवळ येऊन मला मिठी मारतो, तेव्हा समजतं की तो माझा मुलगा झार आहे." फराह खानने पुढे पती शिरीष कुंदरबद्दल बोलताना त्याच्या योगदानाचं कौतुक केलं. ती म्हणाली, "जेव्हा आपल्याला एखादी गोष्ट खूप हवी असते, तेव्हा ती मिळवण्यासाठी आपण सर्वस्व पणाला लावतो. पण ती मिळाल्यानंतर तिचं महत्त्व वेगळ्या रूपात जाणवायला लागतं. आज मी शिरीषचं महत्त्व एक उत्तम वडील आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारा माणूस म्हणून पाहते. त्याच्याशिवाय आमचं घर चालूच शकत नाही. मी त्याला नेहमी गंमतीने म्हणते, तू मुलांना घेऊन कुठे गेलास तर माझं Wi-Fi कोण दुरुस्त करणार? शिरीषशिवाय आमचं घर चालू शकत नाही. तो एक उत्कृष्ट वडील आहे. माझ्या मुलांना इतक्या चांगल्या विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळाला. लोक मला विचारतात, तुमच्या मुलांचा करिअर काउन्सेलर कोण होता? तेव्हा मी एकच उत्तर देते, त्यांचे वडीलच त्यांचे काउन्सेलर होते." फराह खान आणि दिग्दर्शक शिरीष कुंदर यांनी ९ डिसेंबर २००४ रोजी लग्न केलं. त्यानंतर २००८ मध्ये आयव्हीएफच्या मदतीने त्यांना अन्या, दिवा आणि झार ही तिघं मुलं झाली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कोलवड येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया १ जुलैपासून सुरू

बुलढाणा/ चिखली

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला अंतर्गत कार्यरत असलेल्या आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, कोलवड (ता. बुलढाणा) येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना १ जुलै २०२६ पासून ऑनलाइन अर्ज करता येणार असून, बुलढाणा तसेच परिसरातील जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन गृहपाल एस. एस. चौरपगार यांनी केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, डिप्लोमा, पदवी, पदविका तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी १ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत ://... या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरावेत. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत व सर्व आवश्यक कागदपत्रांसह १५ जुलैपूर्वी वसतिगृह कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी मूळ कागदपत्रांच्या स्पष्ट प्रती संकेतस्थळावर अपलोड कराव्यात. अर्जामध्ये विद्यार्थ्यांचा स्वतः चा आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक नमूद करणे आवश्यक असून, आधार कार्ड, मोबाईल क्रमांक आणि बँक खाते परस्पर संलग्न असणे गरजेचे आहे. तसेच अर्जात नमूद केलेले बँक खाते कार्यरत असल्याची खात्री करूनच त्याची नोंद करावी. अर्जातील नाव आधार कार्डावरील नावाप्रमाणेच अचूक भरावे. विद्यार्थी व पालकांचे स्वयंघोषणापत्र जोडणे अनिवार्य असून त्याचा नमुना संकेतस्थळावरील सूचना फलकामध्ये उपलब्ध आहे. अर्जासोबत उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, गुणपत्रिका, आधार कार्ड, बोनाफाईड प्रमाणपत्र किंवा प्रवेश घेतल्याची मूळ पावती, विद्यार्थी व पालकांचे स्वयंघोषणापत्र, बँक पासबुकची प्रत आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो आदी कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. अर्ज भरताना कोणतीही चुकीची माहिती नोंदविली जाणार नाही, याची विशेष काळजी विद्यार्थी व पालकांनी घ्यावी, असे आवाहनही गृहपाल एस. एस. चौरपगार यांनी केले आहे.

# बुलढाणा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मतदार यादी कार्यक्रम जाहीर

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघ मर्यादित, बुलढाणा यांच्या सन २०२४-२५ या वर्षांच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रारूप व अंतिम मतदार यादी तयार करण्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. जाहीर कार्यक्रमानुसार ३० जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्याच दिवशी मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यासाठी नोटीस बोर्डावर सूचना प्रसिद्ध केली जाईल. ३० जून ते २३ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत दावे व हरकती स्वीकारल्या जातील. प्राप्त दावे व हरकतींवर २५ जुलै २०२६ रोजी निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर ३१ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ वाजता अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), अमरावती, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), बुलढाणा यांच्या कार्यालयातील नोटीस बोर्डावर ही माहिती प्रसिद्ध करण्यात आली असून, पात्र सभासदांनी विहित मुदतीत दावे व हरकती सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जलजीवन मिशनचे ५ कोटी पाण्यात? देऊळगाव महीत शोले स्टाईल आंदोलन...



जनसंचलन/ देऊळगाव मही

केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत देऊळगाव मही शहरासाठी तब्बल ५ कोटी रुपयांची नळ योजना मंजूर होऊन पाच वर्षांपूर्वी काम सुरू झाले. मात्र ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे आजही हे काम अपूर्णच असल्याने शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, संतापाचा उद्रेक अखेर रस्त्यावर नव्हे तर थेट पाण्याच्या टाकीवर पाहायला मिळाला. आज २९ जून रोजी सकाळी ८ वाजेपासून ग्रामपंचायत सदस्य संदीप राऊत, अनंता इंगळे यांच्यासह कारभारी देढे, सागर रोतळे, हरि शिंदे यांनी फिल्टर प्लॅन्टवरील पाण्याच्या टाकीवर चढून ङ्गशोले स्टाईलफ आंदोलन सुरू केले. या आंदोलनामुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली. आंदोलनस्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनकर्त्यांनी पाणीपुरवठा विभागाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तीव्र नाराजी व्यक्त केली. वारंवार लेखी निवेदने देऊनही विभागाने दुर्लक्ष केले, सात दिवसांची मुदत देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही, असा आरोप यावेळी करण्यात आला. दरम्यान, पाणीपुरवठा विभागाच्या महिला कनिष्ठ अभियंता श्रद्धा बनकर, कनिष्ठ अभियंता आकाश कचरे आणि भूषणकुमार आडे यांनी आंदोलनस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. जलजीवन मिशन अंतर्गत अपूर्ण राहिलेले काम २ जुलैपासून सुरू करून फिल्टर प्लॅन्ट टाकीपासून शहरातील वेशीपर्यंत ५.५ किमी पाईपलाईनचे काम पूर्ण करण्यात येईल, तसेच पाणीपुरवठा वितरणातील त्रुटी दूर करून व्यवस्था सुरळीत केली जाईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले. यावेळी सरपंच वसुदेव पाटील, ग्रामविकास अधिकारी वसंतराव चेके, शेख जुल्फेकार, माजी सरपंच रामा म्हस्के यांच्यासह ग्रामस्थ व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# चिखली तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस च्या वतीने वटपौर्णिमेला वडाची १०१ झाडे वाटून वट सावित्री पौर्णिमा साजरी.



जनसंचलन-चिखली

हिंदू संस्कृती मध्ये स्त्रिया आपल्या पतीच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व सुखी वैवाहिक जीवनासाठी मनोभावे वडाची पूजा करतात. धार्मिक दृष्ट्या महत्वाचे असलेले हे वडाचे झाड वैज्ञानिक दृष्ट्या ही खूप महत्वाचे आहे ते उच्च ऑक्सिजन निर्मिती करते, उन्हाळ्यात बाष्पीभवनाद्वारे जवळपास २ टन पाणी वातावरणात सोडते त्यामुळे तापमान कमी होण्यास मदत होते. हवेतील विषारी वायू शोषते. जैवविविधतेच्या दृष्टीने ही वडाचे झाड खूप महत्वाचे आहे, पक्षी, खारी, मधमाश्या यासह असंख्य जीवाचे ते आश्रयस्थान आहे. हे वैज्ञानिक महत्व लक्षात घेऊन हिंदु संस्कृतीत याला पूजनीय स्थान दिले गेले आहे. परंतु आज रोड रस्ते, विकासाच्या कामात ही झाडे कमी होत चाललेली आहेत म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चिखली च्या वतीने बेराळा, मुरादपूर, रामनगर, मेरा खुर्द, देऊळगाव घुबे, कोणड, अमोना, मंगरूळ, अंचरवाडी या गावी ऐकून १०१ वडाच्या झाडांचे संगोपणासाठी वाटप करण्यात आले. यावेळी प्रत्येक गावात प्रतियोगिता आयोजित करून जी महिला पुढील वर्षी सर्वात चांगले झाड वाढवेल तिला पैठणीचे बक्षीस ही जाहीर केले. सदर वडाची झाडे ही जिल्हा कार्याध्यक्ष शंतनू बोन्द्रे चिखली तालुका अध्यक्ष संतोष परिहार, यांच्या शुभहस्ते व राजेंद्र सुरडकर, भगवान बाप्पू, अनंथा गाडेकर, ज्ञानेश्वर गाडेकर, रामेश्वर इंगळे, रमेश अवचार, मापारी ठेकेदार,ग्रामसेवक वीर साहेब, उपसरपंच मेरा,रामदास मुजमुले, राजेंद्र घुबे,अमोल घुबे,विजय जावळे, प्रल्हाद इंगळे,गजानन पाटिलबा इंगळे, दत्तू गावडे, ग्रामसेवक सोळंकी,दामुअण्णा शिंदे,दत्तात्रय रुपसिंग परिहार. सतीश सोनुने, पांडुरंग भवर यांच्या उपस्थितीत प्रत्येक गावच्या उपस्थित सुवासिनी माता भगिनी यांना वाटप करण्यात आले

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्याच्या सुपुत्राकडेच आरोग्य विभागाची कमान; डॉ. रणजीत मंडाले बुलढाण्याचे नवे डीएचओ!

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची सूत्रे आता जिल्ह्याच्या भूमिपुत्राच्या हाती आली आहेत. सिंदखेडराजा तालुक्यातील पळसखेड चक्का येथील सुपुत्र डॉ. रणजीत मंडाले यांची बुलढाणा जिल्हा आरोग्य अधिकारी अर्थात पदी नियुक्ती झाली असून, जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेच्या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. कर्तव्यनिष्ठ सेवा, अभ्यासू वृत्ती आणि आरोग्य विभागातील प्रदीर्घ अनुभवाच्या बळावर डॉ. मंडाले यांनी हा मानाचा टप्पा गाठला आहे. आता जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, वेगवान आणि सर्वसामान्याभिमुख करण्याची मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. डॉ. रणजीत मंडाले यांचा आरोग्य सेवेतील प्रवास संघर्षमय आणि प्रेरणादायी आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात देऊळगावमही ग्रामीण रुग्णालयातील ११ महिन्यांच्या सेवेतून केली. त्यानंतर मलकापूर पांगरा प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांनी रुग्णसेवा दिली. पुढे यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी एमडी ही उच्च पदवी प्राप्त केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी मेहकर येथे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली. त्यांच्या कामाची दखल घेत त्यांची अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी पदावर नियुक्ती झाली होती. आता शासनाच्या ताज्या बदली आदेशानुसार त्यांच्याकडे बुलढाणा जिल्हा आरोग्य अधिकारी पदाची कमान सोपवण्यात आली आहे. स्थानिक सुपुत्रच जिल्ह्याच्या आरोग्य विभागाच्या सर्वोच्च जबाबदारीवर विराजमान झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा, प्राथमिक आरोग्य केंद्रांची कार्यक्षमता, लोककल्याणकारी




योजना आणि सर्वसामान्य रुग्णांपर्यंत सुविधा पोहोचवणे, ही त्यांच्यासमोरील मोठी कसोटी असणार आहे. शासनाच्या आरोग्य विभागाच्या सर्व योजना जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हेच माझे मुख्य ध्येय आहे. जिल्ह्याची आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी मी कटिबद्ध आहे,असे डॉ. रणजीत मंडाले यांनी सांगितले.

# नांदुराजवळ थरार! नागपूर-जळगाव खाजगी बस बाह्यवळणावर पलटी; १० ते १२ प्रवासी जखमी, जीवितहानी टळली



जनसंचलन-नांदुरा

नांदुराजवळील बाह्यवळण मार्गावर आज भीषण अपघाताची घटना घडली. नागपूरहून जळगावकडे जाणारी एक भरधाव खाजगी प्रवासी बस अचानक पलटी झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या अपघातात अंदाजे १० ते १२ प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.अपघातानंतर बसमधील प्रवाशांमध्ये आरडाओरड सुरू झाली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी प्रवाशांना तात्काळ बाहेर काढून नांदुरा तसेच खामगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली असून काहींवर पुढील उपचार सुरू आहेत. दरम्यान, बस भरधाव वेगात असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले असावे, अशी चर्चा घटनास्थळी सुरू होती. मात्र अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या भीषण अपघातात बस पूर्णपणे पलटी झाली असली तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र नांदुरा बाह्यवळण मार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# शेगाव रेल्वे स्थानकावर इंजिनसमोर दिसलं काहीतरी अन् क्षणभर थांबले श्वास; लोहमार्ग पोलिसांनी वाचवला राष्ट्रीय पक्षी!



जनसंचलन-शेगाव

रेल्वे स्थानकावर लोहमार्ग पोलिसांच्या तत्परतेमुळे राष्ट्रीय पक्षी मोराचा जीव वाचल्याची हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. भुसावळबडनेरा मेमो पॅसेंजर शेगाव रेल्वे स्थानकावर दाखल झाल्यानंतर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले की, रेल्वे इंजिनच्या समोरील भागात एक मोर अडकलेला आहे. घटनेची माहिती मिळताच लोहमार्ग पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी अत्यंत सावधगिरीने आणि काळजीपूर्वक मोराला इंजिनच्या भागातून बाहेर काढले. सुदैवाने प्राथमिक तपासणीत मोराला गंभीर दुखापत झाली नसल्याचे आढळून आले. त्यानंतर पुढील उपचार व देखभालीसाठी मोराला वन्यजीव अभ्यासकांच्या ताब्यात देण्यात आले. लोहमार्ग पोलिसांनी दाखवलेल्या या तत्परता, संवेदनशीलता आणि भूतदयेच्या कृतीचे प्रवासी, रेल्वे कर्मचारी आणि नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे. राष्ट्रीय पक्ष्याचा जीव वाचवून पोलिसांनी केवळ कर्तव्य बजावले नाही, तर माणुसकीचाही सुंदर आदर्श घालून दिला आहे.

# मुक्ताईनगरात थरार! ट्रॅक्टरची बेफिकीर रिव्हर्स गाडीच्या बोनेटवर; ॲड. चेतन झनके व विशाल झनके थोडक्यात बचावले!

जनसंचलन/मुक्ताईनगर

मुक्ताईनगर विधानसभाक्षेत्र युवक काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. चेतन झनके आणि त्यांचे बंधू विशाल झनके हे सोमवारी दुपारी भीषण अपघातातून अक्षरशः थोडक्यात बचावले. मलकापूर येथील काम आटोपून ते मुक्ताईनगरकडे कारने जात असताना महाजन पेट्रोल पंपासमोर, बोदवड रोडवर हा थरारक प्रकार घडला. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे १२.४५ वाजता या भागात रस्ता दुभाजकाचे काम सुरू होते. त्याचवेळी एक ट्रॅक्टर भरधाव वेगाने पुढे गेला आणि काही अंतरावर अचानक थांबला. ट्रॅक्टरच्या मागे असलेल्या झनके बंधूंनी आपली कार क्रमांक १९ ८७०४ सुरक्षित अंतरावर थांबवली. मात्र समोर जागा नसल्याने ट्रॅक्टर चालकाने मागे-पुढे कोणतीही खात्री न करता थेट ट्रॅक्टर रिव्हर्स घेतला. कारमधून सतत हॉर्न वाजवण्यात येत होता, परंतु चालकाने कानात हेडफोन घातले असल्याने त्याला हॉर्न ऐकू गेला नाही. विशेष म्हणजे कारच्या



मागे ट्रक उभा असल्याने कार मागे घेण्याचाही मार्ग बंद झाला होता. काही क्षणांतच ट्रॅक्टरच्या ट्रॉलीचे चाक कारच्या बोनेटवर चढले. ट्रॉली बोनेट चिरत थेट पुढील काचेपर्यंत येऊन पोहोचली. काचेपासून अवघ्या अर्ध्या फुटावर ट्रॉली थांबल्याने झनके बंधूंचे प्राण वाचले; अन्यथा मोठी जीवितहानी झाली असती. या घटनेनंतर परिसरातील नागरिकही हादरले. अवजड वाहनांचा भरधाव वेग, चालकांची निष्काळजीपणा आणि हेडफोन लावून वाहन चालवण्याचा प्रकार किती जीवघेणा ठरू शकतो, हे या अपघातातून पुन्हा स्पष्ट झाले आहे. यापूर्वीही बऱ्हाणपूर रोडवर भरधाव डम्परच्या धडकेत दोन युवकांचा बळी गेला होता. तरीही प्रशासन आणि वाहतूक नियंत्रण यंत्रणा जागी होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८